# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

**Year - 7, Vol. I, Issue- LV, 28 March 2022**


शासकिय अध्यापक महाविद्यालय, नांदेड.


संलग्नित

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या द्वारा आयोजित

## एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिसंवाद (ऑनलाईन)

# मराठी साहित्यातील स्त्री प्रतिमा




* प्रमुख संपादक *

प्राचार्य डॉ. उर्मिला धूत

* संपादक *

प्रो.डॉ. शैला सारंग

* सह संपादक *

प्रो.डॉ. वनिता रामटेके



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned with CamScanner

...डबडब-या दैवाच्या आवाजामुळे 'राघू' परत आलेले आहे. हे सर्व चित्र अतिशय मनोवेधक आहे. तर हेच राघू, ...ळे मोडून जातात.

रानातले उनाड राघू, पिरत्या घालीत आले

...वरल्या साळुंकीला डोळे मोडून गेले[3] (वही पृ.२५).

...राघूचे खोडकर वागणे ही प्रेमाच्या खेळकर रूपातून आले आहे. आपल्या मनातील प्रेम भावनेला साकार ...डबडबणा-या या राघूना आकाशात भरून येणा-या मेघांमुळे चांगलीच संधी प्राप्त होते.

"...ओथंबून येती

...राघू पिरपिरती" [4] (वही पृ.४९)

...पिरट्या घालणारे हे राघू पडणा-या पावसाच्या सरीत आपली प्रेम कहाणी पुढे नेतात. ही प्रतिमा जणू ...ची प्रतिमा बनून या कवितेत आलेली आहे.

निसर्गातील एक उत्कट अशी चित्रप्रतिमा येथे येते. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यात कवी चिंब निजून गेला आहे. ...वरून साकार होणा-या प्रतिमाही उत्कट होतात. रात्रभराच्या झडीमुळे पिकात भरलेला गंध केसर गंध होतो

"फुले आले न्हाण

रानवा-याला उधाण

मना गंधे वेटाळून [6](वही १८)

...नपेटून घ्यावे, नवे मेघाची आभाळ (वही ५.३०) आणि हा साजन माय छेनछबिला आहे, तो घन होऊन ...(वही पृ.४९) पौषात हिवाळीरात गळ्यामधी हात,गच्च गुंफावे (वही-५१) असे तिला होते आपल्या सुकुमार देहाच्या ...तून ती आपल्याला म्हणते, देह कोवळी डहाळी, नव्या नवतीची केळी, जरा तंग झाली चोळी (वही पृ.५४) अशा रूपवान ...च्या महालात राहण्याचा तिला जवळ घेण्याचा प्रयत्न काळोख करतो ,तिला काळोखात कवळून घ्यायला काळोख झिंगत ...(..रानातल्या कविता,८.) एक राजवंशी पंखाचे पाखरू येते आणि तिच्या अंगाशी लगट करून जाते. (रानातल्या कविता ...!) डगातल्या सावल्यांना उन गच्च बिलगून असते (रा.क..६१), राजस देहाला आभाळ पांघरून येते (रानातल्या कविता,४६) महानोर शृंगारभावना व्यक्त करतात. या प्रतिमांमुळे त्यांच्या प्रेमकवितेला वेगळे रूप प्राप्त झाले आहे. निसर्ग आणि व्यक्ती यांचा शारीरिक पातळीवरील संदर्भ यामागे आहे. कवीने ग्रामीण जीवन, निसर्ग तेथील शृंगार याप्रमाणेच ग्रामीण ...तील स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुखद वास्तव आणि स्त्रीची आगतिकता घेऊन स्त्रीविश्वाला तिची कहाणी मधून ...लेले दिसते. पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रीच्या जगण्याला आलेले वेदनादायी जीवन, तिचे काबाडकष्ट, तिच्या जीवाची ...री अबाळ, घरादारासाठी राबणारी, शब्दहीं न काढता सोसत राहणे, तर कधी परिस्थितीशी दोन हात करण्याची क्षमता ...ली स्त्री अशा स्त्रीच्या जगण्याला वागण्याला कवी उत्कटपणे साकारतो. कवीने या ग्रामीण स्त्रीच्या शोकाच्या ...ची प्रतिमाचित्रे येथे उभे केले. या कविता प्रामुख्याने स्त्रीजीवनाचे सुबोध दर्शन घडवितात. स्त्री म्हणून तिच्या ...ला उभे करण्याचा प्रयत्न कवी करतो. स्त्रिच्या भोवती असणारी विविध नाती येथे तिच्या जगण्याला कशी प्रभावित ... असतात हे ही इथे आढळते तसेच घरात, शेतात राबणा-या स्त्रिच्या कष्टाला कवी शब्दबध्द करतो. "महानोर या ...च्या चित्रणाकरवी पुन्हा एकदा त्या लोकजीवनाशी आपले धागे जुळवून घेतात. तारूण्य व वार्धक्य या दोन्ही अवस्था ...तल्या प्रतिमांच्याद्वारेच रेखाटल्या जातात. महानोरांच्या या कवितांमधून त्यांचे गंभीर निरीक्षण लक्षात येते. कवी स्त्री, निसर्ग यांची केवळ शृंगारासाठी सांगड घालत नाही. यातील प्रतिमांमधूनही स्त्रीचे वास्तव जीवन तिचे कष्ट घरासाठी त्याग ...अशा विविध भाव भावना यात आढळतात, म्हणूनच तिची कहाणी भारतीय स्त्री जीवनाचे प्रत्ययकारी भावचित्र बनले आहे असे वाटते.

निसर्ग प्रतिमा :

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Shikshan Prasarak Sanstha's Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

# ना.धों. महानोर यांच्या कवितेतून येणा-या स्त्रीविषयक प्रतिम

डॉ. शिवसांब दिनानाथ कापसे

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा जि परभणी.

ना. धों. महानोर यांच्या कवितेतून येणा-या प्रतिमाचा विचार करायचा आहे. कवीच्या अनुभवविश्वाला अर्थ प्रतिमेच्या माध्यमातून व्यक्त करता येते. महानोराच्या निसर्ग कविता, रानातल्या कविता, पावसाळी कविता वेगवे प्रतिमांमधून व्यक्त झाल्या आहेत. मानवी भाव, भावना, हर्ष, खेद, सुख, दुःख या सर्वांना ते प्रतिकात्मक पध्दतीनेच करतात, त्यांच्या कवितेतून निसर्ग अतिशय सहजपणे वावरतो, जणू सर्व कविता निसर्गाचे एक प्रतीक म्हणून वाटावी. अनुभवही प्रतिकाच्याच भाषेतून येतात. याविषयी प्रा. प्रसन्नकुमार पाटील म्हणतात, "हे जे विविध अनुभव व्यक्त होता प्रेमजीवनाच्या वेगवेगळ्या छटांचे अनुभव होत आणि हे अनुभव समर्थपणे अंगभूत लय घेऊन विविध प्रतिमांच्या द्वारे होतात, यातच या कवितेचे वेगळेपण दिसून येते.'महानोरांच्या कवितेतून स्त्री पुरुषाच्या नात्याला वेगवेगळ्या प्रतिमाम साकार केले आहे

**स्त्रीविषयक प्रतिमा :**

महानोर याच्या कवितेतून मोठ्या प्रमाणात स्त्रीविषयक प्रतिमांचा वापर करण्यात आलेला आहे, त्या प्रतिमा अति प्रभावी अर्थवाही आणि काहीशा गूढ आहेत. स्त्रीच्या वेगवेगळ्या रूपाला भावनेला आणि मनःस्थितीला व्यक्त करण्याकरि कवीने या प्रतिमाची योजना कवितामधून केल्याचे दिसते. शृंगारभावना, प्रीतीभावना विरहावस्था साकारण्यासाठी या प्रति येतात. चवळीची शेंग पिवळी धम्मक (रानातल्या कविता १४) गंधवती (रा.क.१५). केळ कातीव रूपाची (रा.क.१६) फुललेल्या बोंडापरी (रा.क. १९) बावरा पक्षी (रा. क. २९). माल्हन (रा.क.२९). केळ कमळण (रा.क.३२). राजसपाख (रा.क.३३) ज्वार उभार (रा.क.४४),मन (वही-५४), लखतव बोट (वही-५५) अशी काही निसर्गप्रतिमांमधून महानोरांच्या कवितेतील स्त्री अधिक स्पष्टपणे व्यक्त होते. कधी निसर्गप्रतिमांमधून रोमँटिक स्त्री उभी केली त रमणाऱ्या कवीने स्त्री आणि निसर्ग यांच्यातील आंतरीक संबंध अचलपणे ओळखलेले दिसतात. निसर्गाशी कवीचे तादात्म्य यामुळे लक्षात येते. स्त्रीच्या भावना कवीने सूचकपणे निसर्गामधून व्यक्त केल्या आहेत. स्त्री-पुरुषांच्या देहधर्म, गारकाव्यातून मांडलेला आहे.

महानोर यांच्या अनेक कवितांमधून स्त्री व निसर्ग यांचे चित्र रेखाटले आहे. स्त्री आणि निसर्ग हा अनेक कवितांचा गाभा आहे. स्त्रीमध्ये ते निसर्गाला शोधतात आणि निसर्गामध्ये स्त्रीला शोधतात, 'राघू' या प्रतिमेतून प्रियशीच्या ओढीने परत येणारा प्रियकर येतो,

"राघू उठून जाताना फांदीहले झुले
पानांतल्या शेंबापाशी नम उतरले
नम उतरले सर्द जागळीचे झाले
झुलणा-या फांदीपाशी पैजण वाजले
गोरे भुरे प्रेम असे गाण्यात सांडले झुलणा-या
[illegible] (वही-पृ. १४)

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

या निसर्ग चित्रणातून 'झुलणारे झाड' ही प्रियशीसाठी आलेली प्रतिमा जशी महत्वाची आहे तसेच पुरुषांसाठी आलेली राघू ही प्रतिमा देखील महत्त्वपूर्ण आहे. फांदीवरून राघू उठून गेल्यानंतर या चित्रात बदलणारे रंग दिसतात. राघू उठून जाताना पाऊस नसला तरी आकाश जांभळ्या रंगामुळे व्यापून गेले आहे. राघू उठून गेला असला तरी फांदी हलते-झूलते आहे

ना.धों. महानोर यांच्या 'तिची कहाणी' या कवितासंग्रहातून भारतीय स्त्री जीवनाची विविध रूपे साकार करताना निसर्ग प्रतिमांचा ते आधार घेतात. त्यात प्रामुख्याने आभाळ, मेघ या प्रतिमांचे अधिक्य जाणवते. आभाळाला अनेक व्यापकत्व स्त्रीमनाचा, तिच्या दुःखाचा, तिच्या सहनशिलतेचा निर्देश करणारे आहे म्हणून कवी म्हणतो,

"जात्याच्या पाळूत घिरघिरं दाण्याचं
पीठ होताना
प्रत्येक समेला ओवी गातांना
तीच मन भरून येतं ....आभालासारख८

स्त्री अहोरात्र काबाडकष्ट करते. घरासाठी कष्टत राहणे, स्वतःच्या सुखापेक्षा इतरांचा विचार करणे आणि म्हणूनच घरासाठी प्रकाश मागते. तिच्या दुःखाला वाट करू देण्याचे साधन म्हणून ती जात्यावर ओवी गाते. पण मनात दाटलेला उमाळा याचा तसा येतो. पण कधी कधी तिच्यावर आलेली संकटे इतकी मोठी असतात की, त्यातून बाहेर पडणे तिला शक्य होत नाही. अशा वेळी तिच्या मनास अनंत वेदना होतात. यांच्या जीवनात पतीचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. पण आलेल्या स्त्रिच्या मनाची होणारी होरपळ व्यक्त करताना कवी म्हणतो,

काळयाकुट्ट मेघांनी
भरलेल आभाळया डोळयात
भरल्या ओटीन लदबदलेल्या तिच्या नव्या संसारात"९

ग्रामीण भागात स्त्रियांच्या अंगावर घराबरोबरच शेतीचीही जबाबदारी येते. घरकाम करून शेतीवर कामास जाणाऱ्या या स्त्रिया पीकपाण्याचीही काळजी वाहतात. पेरणी, मळणी, उफनणी, अशा शेतीकामात त्या स्वतः झिजवात आपल्या पतीला मदत करतात. शेतीत पिकांचीवाढ व्हावी, उत्पन्न चांगले यावे ही भावना स्त्रियांनाही आहे म्हणूनच तिला,

"कित्येक वर्षांनी भरभक्कम आलेला मृगांचा पाऊस
मोती पवळयांचा चिडी मुंग्यानाही चैतन्य देणारा
मातीचा दरवळ शिवारभर उधळणारा मदमस्त पाऊस.... आभाळभर उपळणारा "१०

पेरणीपूर्वी मृगाचा झालेला पाऊस ग्रामीण स्त्री मनाला आनंद देणारा वाटतो. जणू या पावसामुळे सृजनाची क्रिया सुरू होते. पिकात ईश्वर जन्म घेतो आहे असा भाव तिला वाटतो. 'पाऊस' हा नवनिर्मिती करणारा आहे. त्याचे आणि मातीचे असलेले नाते अतुट आहे.

**कृषीविषयक प्रतिमा**

"तिची कहानी मधून स्त्रियाच्या सुखापेक्षा तिच्या आयुष्याचा भोगवटा आलेला आहे. स्त्रियांचं सोशिकपण, कोलमडून पडणे, दुःख पचवणे नव-याच्या मनमानेल अशा वागण्याला विरोध न करणे तर कधी मुकेपणाने गोवरीगत जळत राहणे, अशा स्त्रियांची जगण्याची कहाणी येथे येते म्हणून कवीला

"तिच्या डोळयात
ऊसाच्या पेटविल्या रानाध्या वेणा-११
दिसतात. आयुष्यभर तक्रार न करताच जगणारी ही स्त्री आहे. तिचे बाईपण तिला दुःख देते. इतकेच नव्हे निसर्गही तिच्या सहनशिलतेची कसोटी पाहणारा आहे.

'रानातले धस्कट" तिच्या शरीराला वेदना देतात,

"वैशाखवणव्यात भेगाळलेली भूई
धस्कटांच्या रानात शिवारात थोडाही ओलावा नाही

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

तिच्या डोळ्यात विस्तीर्ण अवकाश आणि
अंगावर येणारे धस्कटांचे बाहुपाश[१२] (पृ.३५)

डोळे बुडून नेणार साळीचं शेत, निरभ्र आकाश तिला वैशाख वणव्यात जाळतं दुष्काळात भेगाळलेल्या भुईप्रमाणे तिचे जगणे, अशा विविध कृषी घटकातून स्त्रीचे जीवन व्यक्त होते

संदर्भ :


१ पाटील प्रा. प्रसन्नकुमार अक्षरगंध सन्मित्र प्रका.कोल्हापूर ७०
२ महानोर ना. धों. वही, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९८५ १४
३ महानोर ना. धों. उ.नि. २५
४ महानोर ना. धों. उ.नि. ४९
५ महानोर ना. धों. उ.नि १५
६ महानोर ना. धों. वही पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १८
७ महानोर ना. धों. "तिथी कहाणी प्रस्तावना २४
८ महानोर ना. धों. तिचीकहाणी' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती २००० १
९ महानोर ना. धों. उ.नि २८
१० महानोर ना. धों. उ.नि ५०
११ महानोर ना. धों. उ.नि ४
१२ महानोर ना. धों. उ.नि '३५


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani